आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)

गुरुवार, दिनांक ०५ सप्टेंबर २०२४

ठळक बातम्या

1. शिक्षक दिनानिमित्त राष्ट्रीय, राज्य आणि जिल्हा स्तरावर शिक्षकांचा सन्मान; शिक्षक दिन हा शिक्षकांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन.
2. मंत्रिमंडळ बैठकीत अमरावती जिल्हयात मत्स्य विज्ञान महाविद्यालयासाठी जागा देण्याचा निर्णय; महानुभाव पंथाच्या देवस्थानांच्या विकासासाठी भरीव निधीची तरतूद; तर नागपुरातील काटोल, वर्ध्यातील आर्वी, इथं दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर न्यायालय प्रस्तावित.
3. मराठी चित्रपट धोरण निर्मितीसाठी समिती गठित करणार, नागपुरात 100 हेक्टरवर भव्य चित्रनगरी उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय.
4. दिव्यांग प्रवाशांना एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये मिळणार कायमस्वरूपी आरक्षित आसन.
5. राज्यातील ३५८ तालुक्यातील कामगार सुविधा केंद्राचं मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन.

****

शिक्षक दिन-राष्ट्रीय

माजी राष्ट्रपती डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती आज देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरी होत आहे. यानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं राष्ट्रीय शिक्षक पुरस्कारांचं वितरण करण्यात आलं. देशभरातल्या ८२ शिक्षकांना हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये कोल्हापूर जिल्हयातले कलाशिक्षक सागर बगाडे आणि गडचिरोली जिल्हयातले मंतैय्या बेडके यांचा समावेश होता.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांना अभिवादन करत, शिक्षक दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. शिक्षक दिन हा शिक्षकांचं समर्पण, योगदान आणि मार्गदर्शनाप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. मुंबई इथं आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार सोहळ्यात ते आज बोलत होते. खडू आणि छडीच्या जोरावर आयुष्याची शिडी चढायला शिकवणाऱ्या सर्व शिक्षकांना मुख्यमंत्र्यांनी शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शैक्षणिक दर्जा सुधारण्याच्या दृष्टीनं सरकार नेहमीच

प्रयत्नशील राहील असंही मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी त्यांनी सर्व पुरस्कार विजेत्या शिक्षकांचं अभिनंदन केलं. या कार्यक्रमात १०९ शिक्षकांना पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं. आज शिक्षक दिनानिमित्त भंडारा जिल्हा परिषद अंतर्गत प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचा जिल्हा शिक्षक पुरस्कार सत्कार समारंभ आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजिण्यात आला होता.

****

मंत्रिमंडळ निर्णय

अमरावती जिल्ह्यात नवीन मत्स्य विज्ञान महाविद्यालयासाठी जागा देणार असल्याचा महत्वाचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. मत्स्य विज्ञान महाविद्यालयाच्या प्रशासकीय कार्यालयासाठी मोर्शी शहरातील जलसंपदा वसाहतीतील ०.६१ हेक्टर आर तसेच ४.०८ हेक्टर आर जागा तसेच विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिकांसाठी राष्ट्रीय मत्स्य बीज केंद्र सिंभोरा यांची ३३ हेक्टर एवढी जमीन महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ नागपूर यांना देण्यात येईल. या महाविद्यालयातील पदांसाठी ३१ कोटी ४८ लाख रुपये खर्च येईल. त्याशिवाय बांधकाम, फर्निचर वाहन खरेदी यासाठी १७१ कोटी ६ लाख खर्चाला मान्यता देण्यात आली आहे. याशिवाय बुलढाणा जिल्ह्यातील शेवगाव तालुक्यातील सहकारी सूतगिरणीस अर्थसहाय्य देण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. वर्धा जिल्ह्यातील आर्वी आणि नागपूर जिल्ह्यातील काटोल इथं दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर न्यायालय स्थापन करण्याचा आणि या न्यायालयांसाठी 17 पदे मंजूर करण्याचा निर्णय देखील घेण्यात आला आहे. अन्य महत्वपूर्ण निर्णयांमध्ये पुणे- छत्रपती संभाजीनगर इथं सध्याच्या राष्ट्रीय महामार्गाची सुधारणा करणे; बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेचे निकष सुधारणे; विहिरी, शेततळे, वीज जोडणीसाठी भरीव अनुदान; अंगणवाडी केंद्रांना सौर ऊर्जा संच देण्याच्या निर्णयांचा समावेश आहे. औद्योगिक कामगार न्यायालयातल्या न्यायिक अधिकाऱ्यांना सुधारित भत्ते देणे, थकबाकी देणाऱ्या कुक्कुटपालन संस्थांना दंडनीय व्याजाची रक्कम माफ करणे; आदी निर्णय देखील घेण्यात आले. लाडकी बहिणी योजनेमुळे अन्य कोणत्याही योजना बंद होणार नाहीत आणि शेतकरी कुटुंबांना मदत बंद केल्याचे वृत्त चुकीचे असल्याचा खुलासा मदत व पुनर्वसन विभागाने केला आहे. तर राज्यात १२१ टक्के पेरण्या झाल्याची माहिती कृषी विभागाने दिली आहे. राज्यातील मोठी धरणे २०१८ नंतर प्रथमच शंभर टक्के भरली असल्याचं जलसंपदा विभागाने कळवलं आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत सुमारे १ कोटी ६० लाख भगिनींना ४७८७ कोटींचे वाटप झाल्याची माहिती महिला व बाल कल्याण विभागाने बैठकीत दिली.

****

चक्रधर स्वामी

महानुभाव पंथाचे संस्थापक, चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमातून त्यांना आदरांजली वाहण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात चक्रधर स्वामींना नमन केलं आहे. नागपुरात महावितरण आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आलं. 'मराठी साहित्याला समृद्ध आणि संपन्न करून मराठी भाषेचा गौरव करण्यामागे चक्रधर स्वामींचं मोठं योगदान आहे. त्यामुळे मराठी भाषा दिन सर्वज्ञ श्री चक्रधरस्वामींच्या अवतरणदिनी साजरा व्हावा, असे विचार साहित्यिक आणि विचारवंत डॉ. अशोक राणा यांनी व्यक्त केले'. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या भगवान श्री चक्रधर स्वामी अध्यासनात काल 'चक्रधर स्वामींच्या विचारांची वर्तमानकाळातील प्रासंगिकता' या विषयावर विशेष परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

****

महानुभाव- मंत्रिमंडळ निर्णय

आज झालेल्या मंत्रिमंडळ निर्णयात श्री चक्रधर स्वामी यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून महानुभाव पंथाच्या अमरावती जिल्ह्यातील रिद्धपूर सह भिष्णूर, जाळीचा देव, पोहीचा देव, पांचाळेश्वर या देवस्थानांसह राज्याच्या ग्रामीण भागातील ८ देवस्थानांच्या सुमारे २७५ कोटींच्या विकास आराखड्यांना मंजुरी देण्यात आली. यात विदर्भातील अमरावती जिल्ह्यातील श्री संत गुलाबराव महाराज तीर्थक्षेत्रासाठी पहिल्या टप्प्यासाठी २५ कोटी, रिद्धपूर तीर्थक्षेत्रासाठी १४.९९ कोटी तर वर्धा जिल्ह्यातील श्री गोविंद प्रभू देवस्थानासाठी १८ कोटी ९७ हजाराच्या विकास आराखड्यास मंजूरी देण्यात आली. तसेच पर्यटन विभागाच्या नागपूर जिल्ह्यातील धापेवाडा इथल्या श्री विठ्ठल मंदिर देवस्थानाच्या विकासासाठी १६४.६२ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

****

चित्रनगरी

विविध पायाभूत सुविधा आणि अनेक महत्त्वपूर्ण बाबींसाठी प्रसिद्ध असलेल्या नागपूर शहरात मुबंई आणि कोल्हापूर प्रमाणे फिल्मसिटी निर्माण करण्यासाठीची सूचना सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे. मराठी चित्रपट अनुदानासंदर्भात मंत्रालयात आयोजित बैठकीत मुनगंटीवार यांनी काल अनेक

महत्वाचे निर्णय घेतले. मराठी चित्रपटांना व्यापक व्यावसायिक संधी मिळण्याच्या दृष्टीने मराठी चित्रपट धोरण निर्मितीसाठी सांस्कृतिक विभागाच्या वतीने समिती गठित करण्यात येणार आहे. यासोबतच नागपूर इथं शंभर हेक्टर परिसरात भव्य चित्रनगरी निर्माण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु करण्याची सूचना मुनगंटीवार यांनी संबंधित विभागाला दिली आहेत. तसंच अनुदानास पात्र ठरलेल्या चित्रपटात महिला दिग्दर्शिका असल्यास, चित्रपटाला अतिरिक्त पाच लाख रुपयांची प्रोत्साहनपर रक्कम देण्यात येईल, असं त्यांनी यावेळी स्पष्ट केलं. 'अनेक प्रतीथयश साहित्यकार, लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते देणाऱ्या विदर्भाच्या भूमीत चित्रनगरी व्हावी' असा मनोदय मुनगंटीवार यांनी यावेळी व्यक्त केला.

****

राहुल गांधी/सांत्वन

जातीव्यवस्था कायम ठेवण्याचा भाजपचा उद्देश असल्याचा आरोप लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे. सांगली जिल्ह्यात कडेगाव इथं काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार दिवंगत पतंगराव कदम यांच्या स्मारकाचं आणि पुतळ्याचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. काँग्रेस नेते खासदार राहुल गांधी यांनी आज नांदेड जिल्ह्यात नायगाव इथं काँग्रेसचे दिवंगत खासदार वसंतराव चव्हाण यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन, सांत्वन केलं.यावेळी काँग्रेसचेराष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष नाना पटोले,विरोधी पक्ष नेते विजय वड्डेट्टीवार, रमेश चेन्नीथला यांसह महविकास आघाडीतील सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

****

दिव्यांग आरक्षण-एसटी

दिव्यांग प्रवाशांना यापुढे एसटीच्या सर्व प्रकारच्या बसमध्ये आरक्षित आसन कायमस्वरूपी देण्यात आलं असून, ते कोणत्याही थांब्यावर चढल्यास त्यांना त्यांचं आरक्षित आसन उपलब्ध करून देण्याची जबाबदारी संबंधित वाहकाची असणार आहे. त्यामुळे दिव्यांगाचा प्रवास यापुढे अधिक सुखकर आणि आरामदायी होणार आहे. एसटी महामंडळाच्या वाहतूक विभागाने एक परिपत्रक काढून एसटीच्या वेगवेगळ्या प्रकारच्या बसेस मध्ये दिव्यांगांना आरक्षण आसने निश्चित केलेली आहेत. साध्या बसेस पासून शिवनेरी बसेस पर्यंत दिव्यांग प्रवाशांना प्रवासाच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांचे आरक्षित आसन केवळ त्यांच्यासाठी राखीव ठेवण्याच्या सूचना एसटी महामंडळाने स्थानिक एसटी प्रशासनाला दिलेल्या आहेत. याबरोबरच दिव्यांगांना प्रवास करताना कोणती अडचण येऊ नये म्हणून

त्यांना चढ-उतार करताना प्राधान्य दयावे, तसेच त्यांचा थांबा आल्यानंतर त्यांना अवगत करून बसमधून उतरण्यासाठी चालक वाहकांनी सर्वतोपरी मदत करावी, असे निर्देश देखील देण्यात आले आहेत.

****

कामगार सुविधा केंद्र (सेतु)

महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या नोंदणी आणि नूतनीकरणासह सर्व सुविधा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी राज्यातील तालुकास्तरावर सुरु करण्यात आलेल्या तालुका कामगार सुविधा केंद्रांचे (सेतु) उद्घाटन आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, कामगार मंत्री डॉ.सुरेश खाडे यांच्या उपस्थितीत दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आलं. या सेतु केंद्राद्वारे बांधकाम कामगारांची नोंदणी, नूतनीकर तसंच लाभ वाटपाचे अर्ज आणि मुळ कागदपत्रे सादर करता येणार आहेत. त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठीही हे केंद्र मदत करणार आहे. राज्यातील ३५८ तालुक्यात ही कामगार सुविधा केंद्र सुरु होत आहेत. यामुळे कामगारांच्या वेळेत आणि खर्चात बचत होणार आहे.

****

शिक्षक दिन-नागपूर विद्यापीठ

विद्यार्थ्यांना नवनवीन संकल्पनेतून शिक्षण देण्याचे कार्य शिक्षकांना करावे लागणार आहे. त्यामुळे आदर्श शिक्षक हा विद्यार्थीच असतो, असं प्रतिपादन विश्वेश्वरैय्या राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्थान नागपूरचे संचालक डॉ. प्रेम लाल पटेल यांनी केलं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा शिक्षक दिन समारंभ गुरुनानक भवन इथं आज सकाळी पार पडला. या कार्यक्रमात आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. यावेळी डॉ. पटेल प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करीत होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रभारी कुलगुरू डॉ. प्रशान्त बोकारे यांनी देशाच्या विकासात शिक्षकांची मोठी भूमिका असल्याचं सांगितलं. यावेळी आंतर महाविद्यालयीन वार्षिकांक स्पर्धेतील १० हजार रुपयांचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालय नागपूर यांना देण्यात आला.

****

विकास ठाकरे

नागपूर महानगरपालिका आणि सुधार प्रन्यासाकडून स्वच्छतेकडे झालेल्या दुर्लक्षामुळे नागपूर शहरात चिकनगुनिया आणि इतर डासांपासून होणाऱ्या आजारांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. अनेक मुख्य रस्ते आणि निवासी भागांमध्ये

सांडपाण्याचा ओघ सुरू आहे, ज्यामुळे परिस्थिती अधिकच चिंताजनक झाली आहे. अनियोजित कामे आणि प्रशासनाकडून समस्यांचं त्वरित निराकरण करण्यात असलेल्या उदासीनतेमुळे ही स्थिती निर्माण झाली आहे, असा आरोप पश्चिम नागपूरचे आमदार आणि नागपूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष विकास ठाकरे यांनी केला आहे. नागपूर महानगरपालिका आणि नागपूर सुधार प्रन्यासाने तात्काळ अशा ठिकाणांची आणि समस्यांची मुळ कारणे शोधून समस्यांचं निराकरण करावं, अन्यथा, शहर काँग्रेस कमिटी त्वरित आंदोलन सुरू करेल ज्याच्या गंभीर परिणामांची जबाबदारी संबंधित प्रशासनावर असेल अशी चेतावनी ठाकरे यांनी यावेळी दिली.

****

हवामान

अकोला जिल्ह्यात या आठवड्यात झालेल्या पावसामुळे सात महसूल मंडळाच्या परिसरात अतिवृष्टी झाली असून नदी आणि नाल्यांना पूर आला आहे. यात **41** हजार **886** हेक्टरवरील पिकांचं नुकसान झालं असून **82** घरांची पडझड झाली आहे. जिल्हा प्रशासनामार्फत नुकसानीचे पंचनामे करण्यात आले आहेत. दरम्यान, नागपूरसह विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये येत्या ९ सप्टेंबर पर्यंत बहुतांश ठिकाणी मेघ गर्जनेसह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान खात्यानं वर्तवली आहे. या दरम्यान सर्वत्र सतर्कतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

******